


REGISTERED No. B. 3434

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ पुणें, बुधवार तारीख ८ जानेवारी १९४७ अंक २

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

हेड ऑफिसः—पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, ओझर ( जि. नाशिक ), खोपोली पे ऑफिसः

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | ... | रु. ७,९३,८१० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ३,८९,६५५ |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ५२ लाखांचेवर |

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B. (वकील)

- गतवर्षी ऑर्डिनरी शेअर्सवर चार टक्के अधिक अर्धा टक्का करमाफ डिव्हिडंड दिलें.
- मुंबई, नगर, नाशिक, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे ठिकाणीं डिमांड ड्राफ्टस दिले जातात.
- बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एन. एन. क्षीरसागर,
आर. बी. साळवेकर,
बी. ए. एलएल. बी.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.

## दि न्यु सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.

हेड ऑफिस :
१६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई

एकूण खेळतें भांडवल : २,९०,००,००० रु.

वसूल भांडवल, रिझर्व्ह व इतर फंड : ११,६२,९४६ रु.

**स्थानिक शाखा :** १ दादर, २ गिरगांव, ३ ग्रँटरोड, ४ जव्हेरी बाजार, ५ माटुंगा, ६ शीव, ७ विलेपार्ले.

**इतर शाखा :** ८ अहमदाबाद, ९ अहमदनगर, १० अकोला, ११ अमरावती, १२ बडनेरा, १३ बेळगांव, १४ चांदा, १५ क्रॅडॉक टाऊन ( सी. पी. ), १६ दिल्ली, १७ देवळाली, १८ धुळें, १९ गुरगांव ( पंजाब ), २० इचलकरंजी, २१ जळगांव, २२ कारंजा, २३ कोल्हापूर, २४ कोपरगांव, २५ लोणंद, २६ महाड, २७ मालेगांव, २८ मिरज, २९ मूर्तिजापूर, ३० नागपूर शहर, ३१ नंदुरबार, ३२ नाशिक शहर, ३३ नाशिक रोड, ३४ पंढरपूर, ३५ पहाडगंज, ३६ पेण, ३७ पुणें शहर, ३८ पिंपळगांव, ३९ संगमनेर, ४० सांगली, ४१ शाहूपुरी, ४२ सिन्नर, ४३ सिताबर्डी, ४४ यवतमाळ.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

डी. एन. गांडेकर,
बी. ए., एलएल. बी.,
मॅनेजर, पुणें शाखा.
(बुधवार चौक)

डी. डी. देशपांडे, बी. ए.
मॅनेजिंग डायरेक्टर.

लोकांच्या विश्वासास पात्र झालेलें

## दी डेक्कन इंजिनिअरिंग, लिमिटेड.

माधवनगर ( बुधगांव ) एम्. एस्. एम्. रेल्वे

—यांचे—

| नांगर | चरक |
|---|---|
| किसान नं. १०१ ( सहा ते आठ बैली ) | विश्वास ( चार बैली ) |
| किसान नं. १०२ ( चार ते सहा बैली ) | वासुदेव ( दोन बैली ) |
| किसान नं. १०५ ( दोन ते चार बैली ) | राजा ( एक बैली ) |

' मधुकर ' ( सात फण्याचे ) कोळपें ( दोन बैली )

एजंटस्, स्टॉकिस्टस् नेमणें आहेत

# विविध माहिती

**हिंदी कोळशाच्या खाणींतील कामगारांचें वेतन**—कोळशाच्या खाणींतील कामगारांच्या वेतनाच्या परिस्थितीची पहाणी करण्याकरितां हिंदुस्थान सरकार एक कमिटी नेमणार आहे. ह्या कमिटीचें नांव दि कोल माइन्स वेजेस इन्क्वायरी कमिटी असें आहे. ही कमिटी बंगाल, बिहार, मध्यप्रांत व वऱ्हाड येथील कोळशाच्या खाणींची पहाणी करील.

**बी. बी. अँड सी. आय. रेल्वेचे नवीन मॅनेजर**—सर जॉर्ज कफ, जनरल मॅनेजर, बी. बी. अँड सी. आय. रेल्वे, हे मे १९४७ मध्यें सेवानिवृत्त होतील. त्यांच्यामागून त्या जागीं श्री. के. सी. बसले, (सध्याचे जी. आय. पी. रेल्वेचे कन्ट्रोलर ऑफ स्टोअर्स) ह्यांची नेमणूक करण्यांत येईल.

**देशी औषधांना उत्तेजन**—हिंदी सरकार, हकीम व वैद्य ह्यांची एक कमिटी नेमणार आहे. देशी औषधांची वाढ करण्याकरितां ह्या कमिटीचा सल्ला घेण्यांत येणार आहे.

**लाहोर येथें चहापार्टीवर इन्स्पेक्टरचा छापा**—जिल्हा काँग्रेस कमिटीचे नवीन निवडून आलेले अध्यक्ष खलीफा फाजल दिन ह्यांना लाहोर येथील जनतेनें अभिनंदनप्रीत्यर्थ चहापार्टी दिली. चहापार्टी चालू असतां इन्स्पेक्टरांनीं छापा घालून खाद्यपदार्थ ताब्यांत घेतले. पाहुणे मंडळींत काँग्रेसचे अर्थमंत्रि लाला भिमसेन साचर हे हजर होते. खाद्यपदार्थ हुकुमाचा भंग केल्याबद्दल सिव्हिल सप्लाइज इन्स्पेक्टरांनीं हा छापा घातला. अशातऱ्हेचे १५ छापे लग्नाच्या मेजवान्यांवर आदल्याच दिवशीं घालण्यांत आले होते.

**सुताची योग्य प्रमाणांत वाटणी**—मुंबई सरकारनें ऑल इंडिया यार्न डिस्ट्रिब्युशन स्कीमप्रमाणें सूत देण्यांत येत असलेल्या सर्व कापडगिरण्या व हातमाग ह्यांची खानेसुमारी करण्याचें ठरविलें आहे. सुताची योग्य प्रमाणांत वाटणी व्हावी म्हणून ही खानेसुमारी करण्यांत येत आहे. ह्याकरितां जिल्हाधिकारी, विणकरांच्या सोसायट्या व संस्था ह्यांचेमार्फत सर्व विणकरांना छापील अर्ज वाटले आहेत. दोन महिन्यांपूर्वीच हे अर्ज वाटले असले तरी पुष्कळ विणकरांनीं योग्य ती माहिती भरून अर्ज परत पाठविलेले नाहींत. ही दिरंगाई त्यांनाच हानिकारक आहे. ह्याकरितां सर्व विणकरांनीं हे अर्ज योग्य ती माहिती भरून प्रॉव्हिन्शिअल टेक्स्टाइल कंट्रोलर मुंबई ह्यांच्याकडे धाडावेत. विणकर जर खेड्यांत रहात असतील तर त्यांनीं अर्ज जिल्हाधिकाऱ्याचे मार्फत पाठवावेत. ज्यांना सूत सहकारी सोसायटीतर्फे मिळतें त्यांनीं अर्ज त्या त्या सोसायटींच्यामार्फत पाठवावे. विणकरांनीं अर्ज योग्य तऱ्हेनें भरून पाठविले नाहींत तर त्यांना सूत मिळणार नाहीं. सूत वाटणीच्या योजनेप्रमाणें ज्या विणकराचें नांव नोंदलें जाणार नाहीं त्याला पुढें सूत मिळणार नाहीं.

**हिंदुस्थानमधील युरोपिअन आश्रित**—जवळ जवळ १२,००० युरोपिअन हिंदुस्थानचे आश्रित म्हणून राहिले आहेत असें पंडित जवाहरलाल नेहरू यांनीं मध्यवर्ती असेंब्लींत एका प्रश्नाला उत्तर देतांना सांगितलें. युद्धाची सुरवात झाल्यापासून १९४४-४५ पर्यंत सुमारें दीड कोटी रुपये त्यांच्याकरितां खर्च करण्यांत आले. परंतु त्याचा बोजा हिंदुस्थानवर पडलेला नाहीं.

**स्थायी भांडवलासच ज्यास्त मागणी**—ग्रेट ब्रिटनमधील इंडस्ट्रियल अँड कमर्शिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनचा २० जून १९४५ ते ३० सप्टेंबर १९४६ अखेरचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे. त्यावरून, कॉर्पोरेशननें दिलेल्या मदतीपैकीं दोन पंचमांश रक्कम नव्या शेअर भांडवलाचे स्वरूपांत आहे, असें दिसून येतें. खेळत्या भांडवलापेक्षा कायम स्वरूपाचें भांडवल उद्योगधंद्याला कसें लागतें ह्याचें हें लक्षण आहे. लहान उद्योगधंद्यांना सहाय करणें हें कॉर्पोरेशनचें मुख्य उद्दिष्ट आहे. परंतु, त्यांना पैसे देणें किफायतशीर ठरत नाहीं असा जुना अनुभव आहे. हिंदुस्थानांत अशाच स्वरूपाची कॉर्पोरेशन निघणार आहे यास वरील रिपोर्ट मार्गदर्शक होण्याजोगा आहे.

**संयुक्त राष्ट्रांच्या कचेरींत हिंदी लोकांची भरती**—युनायटेड नेशन्स सेक्रेटेरिएटमध्यें निवड करण्यांत येणाऱ्या नोकरवर्गात हिंदी नोकरांचें प्रमाण अतिशय असमाधानकारक आहे. ह्याबद्दल युनायटेड नेशन्स अॅडमिनिस्ट्रेटिव्ह अँड बजेटरी कमिटींमध्यें श्री. रुपलानी यांनीं चीड व्यक्त केली. ही शोचनीय स्थिति सुधारली पाहिजे व वरच्या दर्जाच्या नोकऱ्या हिंदी लोकांना मिळाल्या पाहिजेत असें श्री. रुपलानी म्हणाले. त्याचप्रमाणें आतांपर्यंत जवळ जवळ ७०-८० हिंदी लोकांनीं सेक्रेटेरिएटमध्यें अर्ज केले असल्याचें त्यांनीं सांगितलें. त्यांच्या म्हणण्याला अनेक प्रतिनिधींनीं पाठिंबा दिला व भौगोलिक दृष्टिकोन ठेवून सेक्रेटेरिएटमध्यें नोकरांची निवड व्हावी अशी इच्छा प्रदर्शित केली.

**वैमानिक विद्येला उत्तेजन**—हिंदुस्थान सरकारनें वैमानिक कलेचें शिक्षण देण्याकरितां वैमानिक तज्ञांना परदेशांतून बोलवावें किंवा रॉयल एअर फोर्स अगर रॉयल इंडियन एअर फोर्स ह्यांतील लोकांची नेमणूक करावी, अशा आशयाचे विचार श्री. अध्यक्ष शिवजी वेलजी कोठारी ह्यांनीं कराची एरो क्लबच्या वार्षिक सभेमध्यें प्रगट केले. वैमानिक कलेला उत्तेजन देण्याकरितां निरनिराळ्या विश्वविद्यालयांमध्यें विमानांचा डिप्लोमा कोर्स सुरू करण्यांत यावा असा दुसरा मार्गहि त्यांनीं सुचविला.

**बेलग्रेड येथें जर्मन तज्ञ**—शेतकीप्रधान असलेला युगोस्लाव्हिया उद्योगप्रधान व्हावा म्हणून एक पंचवार्षिक योजना करण्यांत आली आहे. ह्या योजनेबाबत सल्ला देण्याकरितां शे-दोनशे जर्मन शास्त्रज्ञांना बर्लिनहून बेलग्रेड येथें आणण्यांत आले आहे. अनुभवानंतर आणखीहि तज्ज्ञांना बोलावण्यांत येईल. हे शास्त्रज्ञ सध्यां खानावळींत रहात आहेत. परंतु त्यांच्या कुटुंबांना आणण्याची परवानगी देण्यांत आल्यावर त्यांना रहाण्यासाठी निराळ्या जागा देण्यांत येतील.

**गुणाकार करणारें एंजिन**—दोन दहा आकडी रकमांचा गुणाकार सेकंदाच्या २/५००० इतक्या वेळांत करणारें यंत्र (ऑटोमॅटिक काम्प्यूटिंग एंजिन) इंग्लंडमध्यें बनविण्यांत येत आहे. तें तयार करण्यास १५ ते २० लक्ष रुपये खर्च येईल व दोन ते तीन वर्षे लागतील.

**जर्मन युद्धकैद्यांना स्वातंत्र्य देण्याचा प्रयोग**—बरोबर संरक्षक न देतां जर्मन युद्धकैद्यांना बाहेर हिंडण्यास धाडण्याचा प्रयोग ग्रेट ब्रिटनमध्यें करण्यांत येणार आहे. आठवड्यांतून तीन तास त्यांना असें हिंडतां येईल. छावणींतील एकूण कैद्यांपैकीं १०% पेक्षा अधिक कैदी एका वेळीं बाहेर धाडले जाणार नाहींत. त्यांनीं कोणत्याही इमारतींत शिरतां कामा नये किंवा ब्रिटिश नागरिकांशीं बोलतां कामा नये. छावणीपासून एक मैलापेक्षां दूर जाण्यास त्यांना परवानगी नाहीं. शहरांत पांचापेक्षा ज्यास्त व इतर ठिकाणीं विसापेक्षा ज्यास्त कैद्यांनीं समुदायानें जाऊं नये, असेंहि बंधन आहे.

**रशियांत विदेशी भाषांचें अध्ययन**—विदेशी भाषांच्या अध्ययनास प्रोत्साहन देण्यासाठी रशियांतील शाळांतून इंग्रजी, जर्मन व फ्रेंच ह्या भाषांवर खर्चण्यांत येणारा वेळ दुपटीनें वाढविण्यांत आला आहे.

**पॅकबंद माल चोरीला कसा जातो?**—ग्रेट ब्रिटनमधून निर्गत होणाऱ्या मालाचीं खोकीं व गाठी फोडून त्यांतील माल चोरीला जाण्याचें प्रमाण युद्धकाळांत भयंकर वाढलें व हा प्रकार अद्याप चालूच आहे. माल काढून घेऊन त्याचे जागीं रद्दी भरल्याचीं उदाहरणें नेहमीं आढळतात. कोणत्या खोक्यांत किंमतवान माल आहे हें चोरांना समजण्याचा मार्ग म्हणजे त्यासंबंधांतील कागदपत्र त्यांनीं मिळवणें हा होय. हें कसें घडतें ह्याबद्दल चौकशी चालू आहे.

**रेडिओवर कानडींतून बातम्या सांगा**—मद्रास आणि मुंबई नभोवाणी केंद्रांतून कानडी भाषेंत बातमी सांगण्यांत यावी अशी मागणी कर्नाटक प्रां. काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षांनीं सरदार पटेलांच्याकडे केली आहे.

**हिंदी बनावटीचीं रेल्वे इंजनें**—इंजनांच्या उत्पादनासाठी वर्कशॉप स्थापन करण्याकरितां साडे अकरा कोटि रुपयांच्या खर्चास रेल्वे स्टँडिंग फिनॅन्स कमिटीनें मंजुरी दिली आहे. दरसाल १२० इंजनें व ५० बॉयलर ह्यांचें उत्पादन होऊं शकेल. डिसेंबर १९५० अखेर पहिलें इंजन वर्कशॉपमध्यें तयार होऊन बाहेर पडेल, असा अंदाज आहे.

# अर्थ

बुधवार, ता. ८ जानेवारी १९४७

संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. स. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.





प्रो. वा. गो. काळे

## हिंदी आर्थिक परिषदेचें अधिवेशन

हिंदी आर्थिक परिषदेचें २९ वें अधिवेशन कराची येथें अलाहाबाद विद्यापीठांतील प्रो. रुद्र यांच्या अध्यक्षतेखालीं नुकतेंच पार पडलें. आधुनिक राज्यव्यवहारांत सार्वजनिक अर्थशास्त्राला प्राप्त झालेलें महत्व लक्षांत घेतां अशा प्रकारच्या तज्ञांच्या परिषदेकडे सर्वांचें लक्ष वेधणें साहजिक व इष्ट असेंच आहे. पूर्वींही अशा परिषदा भरत आल्या असल्या तरी त्यांना मतप्रदर्शनाचा एक मोका याच दृष्टीनें थोडेंबहुत महत्व प्राप्त होत असे. कारण परिषदेनें कांहीं शिफारसी वगैरे केल्या तरी परकीय सत्तेकडून त्यांची कशी वासलात लागणार हें ठरल्यासारखेंच असे. पण हिंदुस्थानांतील बदलत्या राजकीय युगमानामुळें या हिंदी अर्थ–परिषदेला प्रत्यक्ष कार्याच्या दृष्टीनें अधिक महत्त्व आहे यासंबंधीं वाद होण्याचें कारण नाहीं. आज दिल्लींत हिंदी जनतेचे प्रतिनिधी कारभार पहात असून त्यांना अशा परिषदांच्या मतप्रदर्शनाकडे अगदीं काणाडोळा करून चालणार नाहीं हें उघडच आहे.

युद्धपूर्वकालांत आर्थिक नियोजनाच्या तत्त्वाला अनकुल असणारे अर्थशास्त्रज्ञ सुद्धा विरळाच होते. पण आतां जमाना बदलला असून हिंदी अर्थव्यवस्था कांहीं एका धोरणानें योजनाबद्ध केली पाहिजे या मुद्याबद्दल बहुतेक पुरोगामी अर्थशास्त्रज्ञांचें एकमत झालेलें आहे, आणि कराची येथील अधिवेशनाच्या व्यासपीठावरून प्रो. रुद्र यांनीं याच मताचा पाठपुरावा केला आहे. नियुक्त–अर्थव्यवस्थेविरुद्ध मुख्य आक्षेप असा घेण्यांत येतो कीं त्यामुळें व्यक्तींचे आयुष्य एकाद्या चौकटींत बसविल्यासारखें होऊन जातें. अधिक तपशीलवार बोलावयाचें तर असें म्हणतां येईल कीं अशा प्रकारच्या अर्थव्यवस्थेंत व्यक्तीनें खावें काय, प्यावें काय, रहावें कोठें, वस्त्रप्रावरण कोणतें घ्यावें इत्यादि सर्व बाबी नियोजक सत्तेच्या हातीं जातात. हा आक्षेप दोन महत्वाच्या मुद्याबाबत अगदीं निखालस चुकीचा आहे. पहिला मुद्दा असा कीं, समाजांत रहाणारी कोणतीही व्यक्ति संपूर्णपणें स्वतंत्र अशी असूच शकत नाहीं. तेव्हां प्रश्न असा उत्पन्न होतो कीं, प्रचलित समाजव्यवस्थेंतील आर्थिक व इतर दृश्यादृश्य बंधनें एकंदरीनें समाजाच्या हिताचीं आहेत कीं नाहींत ? नसलीं तर दुसरी कोणतीं तरी बंधनें व नियम सामाजिक व्यवहाराच्या स्थैर्यासाठी पत्करणें ओघानेंच येतें. अनियंत्रित अर्थव्यवस्थेनें समाजाचें धारण–पोषण नीट होत नाहीं हें आता बहुतेक तज्ज्ञांना तरी मान्य झालें आहे. तेव्हां रहाता राहिला एकच मार्ग आणि तो म्हणजे समाज-जीवनाच्या हितासाठी आखलेली नियुक्त अर्थव्यवस्था. दुसरा मुद्दा असा कीं अनियंत्रित अर्थव्यवस्थेंतील व्यक्तिस्वातंत्र्य हें फक्त सधन वर्गाच्याच काय तें बव्हंशानें वांट्याला येतें. निर्धन वर्गाला या स्वातंत्र्याचा प्रत्यक्ष व्यवहारांत मुळींच उपयोग होत नाहीं. अनियंत्रित अर्थव्यवस्थेंत बेकारांना असणारें व्यक्ति–स्वातंत्र्य फक्त उपासापुरतेंच असतें हें कोणालाही नाकबूल करतां येणार नाहीं. सारांश, वरील दोन्ही दृष्टींनी नियुक्त अर्थव्यवस्था हीच योग्य ठरते व रशियासारख्या १९१७ सालापर्यंत मागासलेल्या देशानें तिची व्यवहार्यता सिद्धच केलेली आहे.

पण नियुक्त–अर्थव्यवस्थेचा तात्विक पुरस्कार करणें आणि जनतेच्या हिताच्या दृष्टीनें त्या प्रत्यक्ष अमलांत आणणें यांत फार फरक आहे. अमेरिकन अर्थव्यवस्थाहि एका अर्थानें नियंत्रितच आहे. अमेरिकेंतील उत्पादन साधनांची मालकी आतां केंद्री–करणाच्या टोंकाला पोचलेली आहे. त्यामुळें खाजगी भांडवलशाहीच्या मक्तेदारी अवस्थेपर्यंत पोचलेली अमेरिकन अर्थव्यवस्था मक्तेदारी नियोजनाचें एक प्रकारचें ठळक उदाहरणच आहे असें म्हणतां येईल. हिंदी अर्थव्यवस्थेला अशा प्रकारच्या नियोजनाचें स्वरूप येणें सामान्य जनतेच्या दृष्टीनें अत्यंत अनिष्ट आहे. प्रो. रुद्र यांनीं आपल्या भाषणांत नियोजनाचीं लक्षणे तपशीलवार सांगितलेलीं नाहींत. तथापि अध्यक्षीय भाषणांत इतक्या खोलांत जाणें त्यांना शक्यच नव्हतें. त्यांनीं हिंदी अर्थव्यवस्थेचें अवस्थांतर होत असतांना चार प्रकारच्या मालक–चालकांची वर्गवारी केलेली असून ती योग्य अशीच आहे. सध्यां हिंदी राष्ट्र एक प्रकारच्या अभिनव राजकीय व आर्थिक संक्रमणावस्थेंतून जात असून या अवस्थेंत खाजगी भांडवलाला भरपूर वाव आहे. प्रो. रुद्र यांनीं या महत्त्वाच्या मुद्याकडे लक्ष वेधलें हें फार चांगलें झालें. प्रो. रुद्र यांनीं मालका–चालकाच्या संस्था म्हणून पुढील वर्गवारी केली आहे. ( १ ) सार्वजनिक ( २ ) कॉर्पोरेटिव्ह ( ३ ) सहकारी व ( ४ ) पूर्णपणें खाजगी मालकीच्या संस्थांपैकीं पहिल्या प्रकारची संस्था वीज, वहातूक वगैरे सारख्या सार्वजनिक सोयीच्या बाबतींत उपयुक्त ठरणारी आहे. हिंदुस्थानांतील मद्राससारख्या कांहीं प्रांतिक सरकारांनीं राष्ट्रीकरणाच्या केलेल्या घोषणा सार्वजनिक मालकीच्या तत्वाशीं सुसंगत अशाच आहेत. प्रो. रुद्र यांनीं सुचविलेल्या दुसऱ्या व तिसऱ्या प्रकारच्या संस्था जनतेच्या दैनंदिन गरजा भागविणाऱ्या नवीन उद्योगधंद्यांना उपयुक्त ठरतील अशा आहेत. रहाता राहिल्या केवळ खाजगी भांडवलाच्या संस्था. अशा प्रकारच्या संस्थांना तूर्त कांहीं दिवस संधी देणें योग्य असलें तरी त्यांच्यावर सुद्धा सरकारी नियंत्रणें असणें आवश्यकच आहे. असें स्थूलमानानें म्हणता येईल कीं जगड्व्याळ स्वरूपाचे आधुनिक कारखाने व उद्योगधंदे नव्या हिंदी अर्थव्यवस्थेंतही राष्ट्राच्या मालकीचे झाले पाहिजेत.

प्रो. रुद्र यांनीं आपल्या भाषणांत इतरही कांहीं महत्त्वाचे मुद्दे मांडले आहेत. मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांनीं अर्थशास्त्र व आंकडेशास्त्र यांची वेगळी खातीं करून त्यांच्याकडून माहिती जमविण्याचें व तज्ज्ञ तयार करण्याचें अशीं दोन्हीं कामें करवून घ्यावीं ही त्यांची सूचना अत्यंत अगत्याची आहे. कोणत्याही प्रकारच्या नियुक्त अर्थव्यवस्थेला तज्ञ अर्थशास्त्रज्ञ व आंकडेशास्त्रज्ञ यांच्या मदतीशिवाय एक पाऊलही पुढें टाकतां येणें अशक्य आहे. हिंदी शेतीच्या व्यवसायांत गुरांच्या उत्पत्तीचें महत्व अतिशय आहे. दुधदुभतीं जनावरें व शेतीला लागणारीं गुरें, ह्यांची वृद्धी करण्यासाठी कृत्रिम प्रजोत्पादनाचा उपाय योजण्याचा सल्ला त्यांनीं दिलेला आहे. रशिआ, अमेरिका, ऑस्ट्रेलिआ इत्यादी देशांतुन ही पद्धति अमलात आलेली असून त्या देशांतून आपले लोक शिक्षणासाठी पाठविणें जरूर आहे. गुराढोरांची निपज झपाट्यानें होण्यावर व त्यांची जात सुधारण्यावर हिंदी शेतीचा उत्कर्ष कांहीं प्रमाणांत तरी अवलंबून आहे, यांत शंका नाहीं. रशियांतील सामुदायिक शेतीची व्यवस्था हिंदुस्थानांत आज उपयुक्त ठरणार नाहीं; त्या ऐवजीं सहकारी शेती करावी असें मत त्यांनीं प्रदर्शित केलें आहे तेंही योग्यच आहे: पण हिंदुस्थानांतील शेतकऱ्याला सहकारी शेतीचे धडे देण्यासाठी खुद्द सरकारनेंच पुढें आलें पाहिजे. रशियांत सामुदायिक शेती आहे त्याचप्रमाणें सरकारी शेती आहे. सरकारी शेतीच्या उत्पादनांत होणाऱ्या वाढीमुळें रशियांतील शेतकरी पुढें आपण होऊन सामुदायिक शेती करूं लागले ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. जमिनीच्या इतस्ततः पसरलेल्या तुकड्यांत शेती करण्यापेक्षां मोठ्या प्रमाणावर आधुनिक तऱ्हेनें केलेली शेती किफायतशीर होऊं शकते ही गोष्ट सरकारनें प्रत्यक्ष अनुभवानेंच हिंदी शेतकऱ्याला पटविली पाहिजे. त्यासाठी सुपीक परंतु पडीक जमिनी लागवडीस आणून सरकारच्या मालकीची सहकार्यानें चाललेली शेती नव्यानें उत्पन्न करणें अत्यंत आवश्यक आहे. त्याचप्रमाणें स्वतःच्या मालकीची जमीन नसणारे

शेतकरी एकत्र आणून त्यांना सवलती देऊन पडीक जमिनी सामुदायिक शेतीच्या क्षेत्रांत आणण्याचेही प्रयत्न एकाचवेळीं झाले पाहिजेत. शेतीबाबत मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांनीं अशी द्विविध आघाडी उघडली तर हिंदी शेतीच्या उत्पादनांत वाढ होण्याला मदत होईल. प्रो. रुद्र यांनीं, शेतीच्या मालाला योग्य किंमती मिळण्याची शाश्वति उत्पन्न केली गेली पाहिजे असें सांगितलें आहे, त्याबद्दलहि दुमत होण्याचें कारण नाहीं.

# स्फुट विचार

## विमा कंपन्यांचा व्याप वाढला परंतु ताळेबंदी परिस्थिति सुधारली नाहीं.

१९४५ हें वर्ष आयुर्विमा कंपन्यांना, नव्या मिळालेल्या कामाच्या दृष्टीनें, उत्कृष्ट गेलें. हिंदुस्थानांत एकूण १३५ कोटि, १८ लक्ष रुपयांचें विमे उतरण्यांत आले, त्यापैकीं १२२ कोटि, ७८ लक्ष रुपयांचें काम हिंदी कंपन्यांस मिळालें व बाकीचें काम विदेशी कंपन्यांकडे गेलें. १९४४ सालांतील एकूण कामाच्या आकड्यापेक्षां १९४५ सालांतील कामाचा आकडा २९ कोटि, १८ लक्ष रुपयांनीं मोठा आहे. त्याचप्रमाणें, १९४४ चें मानानें १९४५ सालीं हिंदी कंपन्यांस २७ कोटि, ५८ लाखांचें ज्यास्त काम मिळालें आहे. हिंदी कंपन्यांस काम पुष्कळ मिळत असलें, तरी त्यांच्या प्रत्येक पॉलिसीची सरासरी किंमत अल्प असते. १९४५ सालीं विदेशी कंपन्यांनीं दिलेल्या पॉलिसीची सरासरी किंमत ५,७२७ रुपये होती; हिंदी कंपन्यांची तत्सम सरासरी फक्त २,१२८ रुपये भरली. विम्याचें काम वाढलें, ह्याचा अर्थ लोकांत विम्याचा प्रसार अधिक झाला असें समजणें भ्रामक ठरेल, हें उघड आहे. मुख्यतः केवळ युद्धजन्य परिस्थितीचा हा परिणाम आहे. विमा कंपन्यांस काम भरपूर मिळालें व त्यांचें हप्त्याचें उत्पन्न वाढलें तरी त्यामुळें कंपन्यांची भरभराट झाली असें मात्र म्हणतां येणार नाहीं. कंपन्यांनीं गुंतवलेल्या रकमांवर वर्षानुवर्ष कमी कमी व्याज पडत चाललें आहे. त्यांच्या सरासरी लाइफ फंडावर १९३८ सालीं ५·१५ इतकें द. सा. द. शे. व्याज पडलें; हा दर सालोसाल उतरत जाऊन १९४५ सालीं ३.४८ वर आला आहे आणि तो १९४६ सालीं ह्याहीपेक्षा खालीं गेला असण्याचा संभव आहे. १९४६ च्या शेवटच्या तिमाहींत ३½ टक्क्यांच्या रोख्यांचें कमी व्याजाच्या रोख्यांत रूपांतर करण्यांत आलें, ह्याचा सरा परिणाम १९४५ च्या हिशेबांत पूर्णपणें प्रतिबिंबित झालेला नाहीं. अशा रीतीनें, विमा कंपन्यांना व्याज कमी सुटलें, परंत खर्चाचें प्रमाण मात्र वाढत गेलें आहे. १९४० सालीं तें २८·९ होतें, तें १९४५ सालीं ३२·२ झालें. विमा कंपन्यांतील नोकर वर्गानें आपले पगार वाढवून घेण्याचे संघटित प्रयत्न चालविले आहेत आणि कित्येक कंपन्यांच्या नोकरांनीं संप पुकारून आपलें उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न केला आहे. नोकरवर्गाच्या दृष्टीनें ज्यास्त वेतन मिळणें अत्यावश्यक असलें तरी त्याचा कंपन्यांच्या हिशेबावर प्रतिकूल परिणाम होणें स्वाभाविक आहे. कंपन्यांनीं आपले हप्त्यांचे दर वाढविले असले, तरी ते कंपन्यांना पुरेसा नफा मिळवून देण्यास समर्थ नाहींत. ह्या कारणानें, कंपन्यांचा व्याप वाढला तरी ताळेबंदी परिस्थिति सुधारली नाहीं, असेंच १९४५ मधील आयुर्विमा व्यवसायाचा आढावा आपणास सांगतो.

## विमा कंपन्यांच्या बोर्डांवर विमेदारांचें प्रतिनिधित्व

हिंदी विमा कायद्यानें विमेदारांना कंपन्यांच्या डायरेक्टर बोर्डांवर प्रतिनिधित्व दिलें आहे. त्याचा उद्देश स्पष्ट आहे. भागीदारांनीं निवडून दिलेले डायरेक्टर विमा कंपन्यांचा कारभार पहात असले, तरी विमेदारांचे हितसंबंध हे अधिक महत्वाचे असतात आणि ह्या दृष्टीनें विमेदारांना कंपन्यांच्या व्यवस्थेवर देखरेख ठेवतां यावी ह्यासाठीं त्यांना आपले प्रतिनिधी बोर्डांवर धाडण्याचा अधिकार देण्यांत आलेला आहे. तथापि, त्या अधिकाराचा उपयोग विमेदारांनीं फारसा केलेला नाहीं, असें दिसतें. विमेदारांच्या डायरेक्टरांच्या एकूण ३९५ निवडणुकींपैकीं फक्त ९५ निवडणुकींत, निवडावयाच्या उमेदवारांपेक्षा उभ्या उमेदवारांची संख्या ज्यास्त होती. २७५ निवडणुकींत जेवढ्या जागा तेवढेच उमेदवार होते आणि २९ निवडणुकींत भरावयाच्या जागांइतकेहि उमेदवार पुढे आले नाहींत. ज्या निवडणुकींत मतदानाचा प्रसंग आला, त्यांतील मतदान पाहिलें, तर फारच थोड्या विमेदारांनीं आपला हक्क गाजवला, असें दिसून येतें. विमेदार सर्वत्र विखुरलेले असतात व ते संघटित नसतात; त्याचप्रमाणें कंपन्यांचे चालक आपले उमेदवार विमेदारांतर्फे निवडून आणूं शकतात. ह्या कारणानें विमेदारांचें प्रतिनिधित्व ही कंपन्यांना केवळ एक खर्चाची बाब होऊन बसली आहे. तिचा अपेक्षित व्यावहारिक उपयोग पुज्याइतकाच आहे.

## हिंदी रासायनिक व औषधी धंद्यांची प्रगति

युद्धकालीन प्रचंड मागणीमुळें हिंदी रासायनिक धंद्याची वाढ होण्यास चांगली संधि मिळाली. रासायनिक धंद्यांतील महत्त्वाचें उत्पादन तेजाब, म्हणजे सल्फ्युरिक ॲसिड याचें युद्धापूर्वी हिंदुस्थानांत ७० हजार टन उत्पादन झालें आणि युद्धाच्या सहा वर्षांत हें उत्पादन १ लक्ष टन झालें. आतां हिंदुस्थानांत इतकें सल्फ्युरिक ॲसिड निर्माण होत आहे कीं त्या ॲसिडचा उपयोग करणाऱ्या कारखान्यांची पुरेशी वाढ जर हिंदुस्थानांत झाली नाहीं, तर लवकरच हें ॲसिड शिल्लक उरूं लागेल. लढाई संपल्यामुळें युद्धखात्याला लागणारें ॲसिड यापुढें दुसऱ्या कारखानदारांमध्यें खपूं शकलें पाहिजे. गेल्या २१ नोव्हेंबर १९४६ ला कलकत्याला इंडियन केमिकल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनची ७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा भरली होती. अध्यक्षस्थानीं मुंबईच्या 'सिप्ला' मधील डॉ. हमीद हे होते. ते म्हणाले, कीं, सल्फ्युरिक ॲसिडची निर्मिति व खप ही देशाच्या औद्योगिक प्रगतीची मोजदाद करण्याची मापें म्हणून समजलीं जातात, त्या दृष्टीनें अमेरिकेचें सदर ॲसिडचें ९० लक्ष टनांचें, इंग्लंडचें १५ लक्ष टनांचें, आणि हिंदुस्थानचें १ लक्ष टनाचें वार्षिक उत्पादन आपला आशय स्वतःच बोलून दाखवूं शकतील. शेतीच्या खतांना लागणाऱ्या सुपरफॉस्फेटस् या प्रमुख घटकासाठीं आणि सल्फेट ऑफ ॲमोनिया, मॅग्नेशियम सल्फेट, फेरिक सल्फेट, सोडीयम सल्फेट व नैट्रिक आणि हायड्रोक्लोरिक ॲसीड यांचे उत्पादनासाठीं या ॲसिडची जरूरी असते. बायक्रोमेट व थायूसल्फेट यांनाहि मोठ्या प्रमाणांत सल्फ्युरिक ॲसिड लागत असून 'कोल टार' पासून जे अनेक उपयुक्त पदार्थ निर्माण केले जातात त्यांच्या उत्पादनासाठीं सुद्धां हे ॲसिड आवश्यक असतें. दुसऱ्या रासायनिक पदार्थांच्या उत्पादनाचा सर्वेहि त्यावरून अंदाजतां येतो. असें असूनहि ऐन युद्धकाळांत सुद्धां सरकारनें या धंद्याला लागणारें गंधक स्वस्त मिळावें याबद्दल शक्यता असूनहि कांहींहि सोय केली नाहीं. युद्धकाळांत मॅग्नेशियम क्लोराइड, बायक्रोमेट, अल्यूमिना फेरिक, सोडियम थायो सल्फेट, नायट्रिक व हायड्रोक्लोरिक असिड व कोल टारजन्य पदार्थ यांचेंहि हिंदुस्थानांत उत्पादन वाढलें आहे. सुमारें ५० लाख रुपये भांडवलाचें एक संघटण संस्थापन करून हिंदुस्थानांत सर्व प्रकारचीं खनिज व प्राणिज आणि महत्त्वाचीं रासायनिक द्रव्यें सर्व कारखान्यांचे संयोजन व सहकार्य करून निर्माण करावयाची अशी योजना या धंद्यांतील मंडळी सध्यां आखीत आहेत. औषधींचे उत्पादनांत सुद्धां हिंदुस्थाननें सध्यां खूप प्रगति केली असून बायोलॉजिकल, स्पिरिच्युअस, वनस्पतीजन्य, अर्कयुक्त औषधांचें उत्पादन सध्यां हिंदुस्थानांत स्वतःची गरज भागविण्यापुरेसें होत असून त्यासाठीं लागणारीं कच्चीं द्रव्यें हिंदुस्थानांत भरपूर आहेत. हिंदुस्थानांतील अल्कलॉइडसचें उत्पादन तर बाहेर देशीं निर्यात करून मोठा धंदा उभारण्याइतकें पुरेसें होत आहे. स्वतः हिंदुस्थाननें निर्माण केलेल्या औषधी द्रव्यांचा खप १९३८–३९ सालीं १ कोटी ४० लक्ष रुपयांचा होता तो १९४२–४३ सालीं ३ कोटी, ५० लक्षांवर गेला आणि त्याच दोन सालांत विदेशी औषधांची आयात ७ कोटी ४० लक्ष रुपयांवरून २ कोटि, ३० लक्ष रुपयांवर आली. अशा या महत्त्वाच्या व वाढत्या धंद्याची पुढील प्रगति होण्यास सरकारी सहानुभूति आवश्यक असून मुख्यतः आयात–निर्यातीच्या जकाती, अपकारी कायदे, करांचें प्रमाण व वहातुकीच्या सोयी या बाबींकडे अधिक लक्ष सरकारनें पुरवावें अशी मि. हमीद यांनीं विनंति केली आहे.

## हिंदुस्थानचें औद्योगीकरण व महायुद्ध

लेखक :—श्री. भास्कर महादेव काळे, एम्. ए., बी. टी., मुंबई

महायुद्धामुळें हिंदुस्थानच्या औद्योगीकरणाला फार जोरदार रीतीनें चालना मिळाली आहे असा सर्वसाधारण समज आहे व सरकारकडूनहि या औद्योगिक चालनेचा गाजावाजा केला जातो. तेव्हां या विधानांत कितपत तथ्यांश आहे व हिंदी उद्योगधंद्यांची आजची परिस्थिति काय आहे याचा येथें थोडक्यांत विचार करूं.

### औद्योगीकरणांत झालेली वाढ

युद्धकार्याला मदत करण्याच्या दृष्टीनें कांहीं उद्योगधंद्यांची वाढ झाली व कांहीं कारखाने तात्पुरते सुरू करण्यांत आले. युद्ध साहित्याच्या दृष्टीनें लोखंड, पोलाद व कापड या कारखान्यांत कांहीं प्रमाणांत वाढ झाली, साखरेचें उत्पादनही वाढलें. सरकारकडून दारूगोळा इ. साहित्य पुरविणारे कांहीं कारखाने निघाले परंतु त्यांचें अस्तित्व युद्धकाळापुरतेंच होतें. श्री. एल्. सी. जैन यांनीं आपल्या एका पुस्तकांत कांहीं आंकडे प्रसिद्ध केले आहेत त्यावरून असें दिसतें कीं, '१९३८–३९ चे उत्पादनाचा आंकडा तुलनेसाठी १०० धरला, तर १९४४–४५ या वर्षी लोखंड–पोलाद यांचें उत्पादन २०० झालें, साखरेचें १८४ झालें, कागदाचें १२६ झालें व कापडाचें ११३ इतकें झालें. चार प्रमुख उद्योगधंद्यांतील हे उत्पादनाचे आंकडे, लोखंड व पोलाद कारखाने वगळल्यास, फारसे उत्साहजनक नाहींत. साखरेचें वाढलें उत्पादन निर्यातीसाठी झालें. कापड गिरण्यांतील १३ टक्के वाढीमुळें औद्योगीकरणाला मदत झाली असें म्हणतां येत नाहीं. कदाचित लोखंड–पोलादाच्या दुप्पट प्रमाणांत झालेल्या उत्पादनामुळें औद्योगीकरणाला मदत होणें संभवनीय आहे. युद्ध परिस्थितींत हिंदुस्थानचें औद्योगिक उत्पादन निश्चित किती वाढलें हें अंदाजानेंच ठरवावें लागतें. युद्ध खात्यानें केलेली खरेदी, हिंदुस्थानांतून यु. किं. क. कॉ. इ. च्या द्वारें झालेली निर्यात, देशांतील अंतर्गत खप व कांहीं मालाची तीव्रतेनें जाणवणारी टंचाई या सर्व गोष्टी विचारांत घेतां देशांतील एकंदर औद्योगिक उत्पादन ३० टक्क्यांहून जास्त प्रमाणांत वाढलें नसावें असें वाटतें.

### कोणतें औद्योगीकरण फायदेशीर ठरतें ?

हिंदुस्थानसारख्या औद्योगिक दृष्ट्या अत्यंत मागसलेल्या देशांत कशा प्रकारचें औद्योगीकरण फायदेशीर ठरेल याचा प्रथम विचार केला पाहिजे. साखर व कापड या धंद्यांत हिंदुस्थान जवळ जवळ स्वयंपूर्ण आहे, तेव्हां या धंद्यांतील उत्पादन वाढणें हें विशेष प्रगतीचें लक्षण नव्हे हें थोड्या विचारानें लक्षांत येईल. औद्योगीकरणाच्या दृष्टीनें यंत्रें तयार करण्याचे कारखाने, विमानें, मोटारी, लोकोमोटिव्हज व मरीन इंजिनें तयार करणारे कारखाने व रासायनिक कारखाने यांची वाढ होणें अत्यंत आवश्यक आहे. युद्ध काळांत, विशेषतः सरकारी धोरणामुळें यांपैकी महत्वाच्या एकाहि कारखान्याची स्थापना झाली नाहीं ही विशेष गोष्ट आहे. लष्करी दारुगोळा इ. कारखान्यामुळें औद्योगीकरणाला मदत झालेली नाहीं, कारण एकच वस्तू अंशतः अनेक विभागांतून व कारखान्यांतून तयार करण्याचें सरकारी धोरण प्रसिद्ध आहे. कापड, साखर, पोलाद इ. पूर्वी होत असलेलें उत्पादन विस्तृत झाल्यानें औद्योगीकरणाला खरीखुरी मदत होऊं शकत नाहीं. मुंबईतील कापड गिरण्या अहोरात्र चालत होत्या हें औद्योगीकरण नव्हे. ही उत्पादनांतलि केवळ वाढ होय. ज्याच्यामुळें नवीन उद्योगधंदे अस्तित्वांत येतील किंवा यांत्रिक कौशल्य वाढेल अशा तऱ्हेच्या उत्पादनामुळें औद्योगीकरणाला खरी मदत होऊं शकते. युद्ध परिस्थितीचा या दृष्टीनें भरपूर फायदा कॅनडा व ऑस्ट्रेलिया या देशांना घेतां आला. हिंदुस्थानांत भांडवल होतें, पुढाकार घेणारे कारखानदार तयार होते, परंतु सरकारी धोरण आड आलें. रोजर मिशनच्या अहवालाला प्रसिद्धीहि मिळाली नाहीं. रासायनिक कारखान्यांच्या बाबतींत किंचित प्रगति होऊं शकली. एका काळीं जहाजें बांधण्यांच्या धंद्यांत पूर्णावस्थेस पोंचलेल्या हिंदुस्थाननें, परदेशी यंत्रें आणून बोटींचें जोडकाम करावें ही औद्योगीकरणाची थट्टाच होय. सारांश, युद्ध परिस्थितींत जें थोडेसें उत्पादन वाढलें त्यामुळें औद्योगीकरणाला मदत झाली असें म्हणतां येणार नाहीं.

### कांहीं फायदे

महायुद्धामुळें प्रत्यक्ष औद्योगीकरणाला मदत झाली नाहीं तरी औद्योगीकरणाला पोषक असें वातावरण युद्ध–परिस्थितीमुळें निर्माण झालें. युद्ध संपण्याच्या पूर्वीं हिंदुस्थानांतील कारखानदारांकडून युद्धोत्तर औद्योगिक पुनर्घटनेसाठी 'मुंबई–योजना' तयार करण्यांत आली. त्याचप्रमाणें 'लोक योजना' व प्रो. आगरवाल यांची योजना पुढें आली. सर्वसाधारण जनताहि या योजनांकडे कुतूहलानें पाहूं लागली. हिंदुस्थान सरकारनें युद्धोत्तर पुनर्घटना खातें निर्माण करून, मुंबई योजनेचे एक जनक सर अर्देसीर दलाल यांची नेमणूक त्या खात्यावर केली. हिंदी रुपयाच्या घसरगुंडीचे युद्ध परिस्थितीच्या दृष्टीनें शास्त्रशुद्ध विवेचन करून चलनविस्ताराकडे लक्ष वेधविणारे अर्थशास्त्रज्ञ प्रो. वकील यांची आर्थिक सल्लागार म्हणून योजना झाली. परंतु एका वर्षांतच सर अर्देशीर व प्रो. वकील यांनीं आपल्या जागांचे राजिनामे दिले. पुढें पुनर्घटना खातेंच हिंदुस्थान सरकारनें बंद केलें. तरीपण युद्ध–कालांत व नंतर भांडवलवाले व मध्यमवर्गीय जनता या सर्वांचें लक्ष औद्योगिक पुनर्घटनेच्या प्रश्नाकडे वळलें ही गोष्ट उत्साहजनक आहे. निरनिराळ्या प्रांतिक सरकारांनीं आपापल्या प्रांतापुरेशा सुरू केलेल्या पुनर्घटनेच्या योजना चांगल्या आहेत.

युद्धकालामध्यें यांत्रिक तज्ज्ञांचा अभाव तीव्रतेनें जाणवल्यामुळें बेव्हिन बॉइज स्कीम अमलांत येऊन कांहीं हिंदी तरुणांना अल्पकाळांत इंग्लंडमध्यें यांत्रिक शिक्षण मिळालें, हा एक औद्योगीकरणाच्या दृष्टीनें देशाचा फायदा होय. सर षणमुखम् चेट्टी यांच्या अध्यक्षत्वाखाली नेमलेल्या कमिटीनें हिंदुस्थानांत यांत्रिक शिक्षणाचा प्रसार कसा व्हावा याबाबतींत सरकारला निश्चित सूचना केल्या आहेत. हिंदी कारखानदार धंद्यांची प्रत्यक्ष माहिती मिळविण्यासाठीं इंग्लंड, अमेरिका इ. ठिकाणीं जात आहेत. ऑस्ट्रेलिया, अमेरिका, कॅनडा इ. देशांतील कारखानदार हिंदी लोकांशीं सहकारिता करावयास तयार आहेत. हिंदुस्थानचें इंग्लंडमध्यें जमा झालेलें सतराशें कोटी रुपयांचें स्टर्लिंग येणें इंग्लंडनें योग्यवेळीं परत केल्यास औद्योगीकरणाला त्याचा चांगला उपयोग होईल.

### सावधगिरीचा इशारा

महायुद्धामुळें औद्योगीकरणाला अनुकूल वातावरण निर्माण झालेलें दिसतें, एवढेंच. औद्योगीकरणाचें पुढें पाऊल कसें पडेल हें कारखानदारांच्या कार्यक्षमतेवर व सरकारी धोरणावर अवलंबून राहील. युद्धकाळांत कारखान्यांना दुप्पट काम पडल्यामुळें व नवीन मशिनरी मिळणें अशक्य असल्यामुळें, बहुतेक कारखान्यांतील मशिनरी अगदी जीर्ण झाली आहे. हिंदुस्थानला मशिनरी तयार करतां येत नाहीं, व रोख पैसे देऊनहि परदेशी कारखानदार योग्य वेळीं मशिनरी पुरवूं शकत नाहींत. याहि परिस्थितीस कारखानदारांना तोंड द्यावयाचें आहे.

---

**दि डेक्कन ॲग्रिकल्चरल इंडस्ट्रीज लि., पुणें**—वरील कंपनीची स्टॅच्युटरी सभा रविवार ता. २९ रोजीं झाली. २६ नोव्हेंबर, १९४६ अखेरचा जमाखर्च त्या सभेस सादर करण्यांत आला. कंपनीनें १ जुलै १९४६ रोजीं कामास प्रारंभ केला. पांच महिन्यांत ५,१२,६९५ रुपयांचे शेअर्स विकले आहेत. कंपनीनें ४०० टनांच्या उत्पादनाची यंत्रसामुग्री मागविली आहे. ऑक्टोबर १९४७ पूर्वी १ हजार एकर जमीन ऊसाखालीं आणतां येईल अशी अपेक्षा आहे. कंपनीकडे ७,४२५ ऑर्डिनरी व १,४५७ प्रेफरन्स शेअर्सचे पोटीं १,८४,४६५ रु. जमा आहेत. ठेवी ३,८५,२०० रुपयांच्या जमा असून ७०,२५५ रुपयांचीं इतर देणीं आहेत. प्राथमिक खर्च ९,९१८ रु. झाला आहे आणि शेअर विक्रीसाठी २२,९७० रु. कमिशन दिलेलें आहे. साखरेच्या यंत्रासाठी १,१३,७२८ रु. अडवान्स दिलेला आहे. महाराष्ट्र ॲ. प्रॉडक्टस अँड इंडस्ट्रीज लि. ची जिंदगी घेतली तिचे पोटीं १,८६,७९० रु. दिले आहेत. मेसर्स जी. व्ही. गोडबोले अँड कं. नें ३ लक्ष रुपयांचे शेअर्स अंडर राईट केले. त्यांनीं ८५,००० रु. ॲप्लिकेशन मनी मिळाला आहे. त्यांना १५ हजार रु. कमिशन दिलें आहे.

## उच्च रहाणीच्या सिद्धीचे प्रयत्न

### ("Towards a Richer Life in Bombay")

आपल्या प्रांतांतील खेड्यांमधील व शहरी नागरिकांचें आयुष्य सुखावह व उच्च दर्जाचें व्हावें ह्या दृष्टीनें केलेल्या परिश्रमांचा आढावा घेणारें एक सचित्र इंग्रजी पुस्तक मुंबई प्रांताच्या लोकमतानुवर्ती सरकारनें नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे. त्याच्या प्रादेशिक भाषांतील आवृत्त्या लवकरच बाहेर पडतील. मंत्रिमंडळाच्या कामगिरीचा प्रथम थोडक्यांत आढावा घेऊन नंतर अन्नपुरवठा, शेती, ग्रामसुधारणा, सहकार, उद्योगधंदे, शिक्षण, आरोग्य, कामगारांच्या सुखसोई, हरिजनांचा उद्धार, दारूबंदी, शांतता व सुव्यवस्था, सरकारी खर्चाची तरतूद, शहर रचना, रस्ते, वीज, पुनर्घटना, इत्यादि शीर्षकांखालीं अधिक तपशील देण्यांत आला आहे. त्यावरून, मंत्रिमंडळापुढील प्रश्नाचें स्वरूप व ते सोडविण्यासाठीं केलेले प्रयत्न ह्यांची कल्पना येते. पुस्तकाची पृष्ठसंख्या ३२ आहे.

---

## मद्रासमधील शेतीच्या उत्पन्नावरील प्राप्तीचा कर

मद्रास सरकार शेतीच्या उत्पन्नावर प्राप्तीवरील कर बसविण्याचा विचार करीत आहे. मद्रासनें प्रथा पाडल्यानंतर इतर प्रांतांतहि हा कर बसणें संभवनीय आहे. त्यासाठीं मद्रासी कर-योजनेची रूपरेषा अवलोकन करणें उपयुक्त ठरेल. सुमारें ५,००० रुपयांच्या वार्षिक उत्पन्नापर्यंत कर आजिबात बसणार नाहीं. ५,००० ते १०,००० पर्यंत रुपयास ९ पै; १०,००० ते १५,००० पर्यंत रुपयास १ आणा; १५,००० ते २०,००० पर्यंत रुपयास दीड आणा; २०,००० ते २५,००० पर्यंत रुपयास दोन आणे; २५,००० ते ३०,००० पर्यंत रुपयास तीन आणे आणि ३०,००० पेक्षां अधिक उत्पन्नावर सरसकट रुपयास चार आणे प्रमाणें प्राप्तीवरील कर आकारला जाईल.

---

## लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय, पुणें

### पेटंट प्रदर्शन

या संस्थेच्या विद्यमानें पुणें येथें येत्या मार्च महिन्यांत पेटंट मिळालेल्या वस्तूंचें प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. या प्रदर्शनाचें योजनापत्रक प्रसिद्ध झालें असून तें सर्वत्र रवाना होत आहे. ही संस्था ३ मार्च हा जमशेटजी टाटांचा जन्मदिनोत्सव साजरा करीत असते, त्या उपक्रमाचा एक खास कार्यक्रम म्हणून हें प्रदर्शन भरविण्यांत येत आहे. या प्रदर्शनासाठीं पुणें सबर्बन म्युनिसिपॅलिटीनें आपला नवा पुणें स्टेशनानजिकचा काउन्सिल हॉल देऊं केला आहे. या प्रदर्शनांत टाटा कंपनी व गोद्रेज कंपनी इ. आपलीं पेटंट्स् पाठविणार आहेत. योजना-पत्रकांत सूचित केल्याप्रमाणें कल्पकतेच्या पेटंट मिळालेल्या वस्तूंचें एक स्वतंत्र संग्रहालय स्थापन करण्याचा संस्थेचा इरादा आहे. या प्रदर्शनास हिंदुस्थान सरकारच्या पेटंट खात्यानें मान्यता देऊन त्याचा सरकारी गॅझेटद्वारां पुरस्कार केला आहे. या संस्थेच्या औद्योगिक व शास्त्रीय ग्रंथसंग्रहालयाचा एक महत्त्वाचा विभाग पेटंट व ट्रेडमार्क या कायद्यान्वयें प्रसिद्ध होणाऱ्या नियतकालिक वाङ्मयाचा फार महत्त्वाचा आहे व त्या ग्रंथालयास या प्रदर्शनाचे द्वारां उत्तम प्रकारचें प्रात्यक्षिक स्वरूप प्राप्त होऊन लोकांच्या कल्पकतेसहि मोठें प्रोत्साहन व चालना मिळणार आहे.


---

**जयपूर मधील कार्डें-पाकिटें स्वस्त झालीं**—जयपूर सरकारनें आपल्या संस्थानच्या पोस्टाच्या कार्डांची किंमत अर्ध्या आण्याची एक पैसा व पाकिटांची किंमत एक आण्याची तीन पैसे १ जानेवारीपासून केली आहे.

**३½ टक्क्यांच्या बदली रोखे**—साडे तीन टक्क्यांचे रोखे बदलून मिळण्यासाठीं ज्यांनीं १६ सप्टेंबर १९४६ पूर्वी अर्ज केले परंतु बदललेले नवे रोखे नेले नाहीत त्यांनीं ते सत्वर घेऊन जावेत. २५ सप्टेंबर १९४६ पर्यंतच्या अर्जांप्रमाणें बदललेले रोखेहि आतां तयार आहेत.

**ब्रिटिश सरकारचा खर्च**—ब्रिटिश सरकारच्या खर्चांत बरीच घट होत आहे, असें गेल्या नऊ महिन्यांचे आकडे दर्शवितात. उत्पन्नाच्या बाबीहि समाधानकारक आहेत. ही प्रवृत्ति टिकल्यास करभार कमी केला जाण्याचा संभव आहे.


पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.

१७२ गिरगांव रोड, मुंबई.

फोन नं. २२७३८








साठे बिस्किटें

युद्धोत्तरकाळीं आम्ही सर्व ग्राहकांची गरज भागवूं शकूं अशी अपेक्षा होती. पण प्रचलित अन्नपरिस्थितिमुळें वाहतुक व पुरवठा याबाबतचीं नियंत्रणें, तसेंच यंत्र-सामुग्रीची ठराविक उत्पादन-शक्ति, या कारणांमुळें अद्याप पुरवठा अपुरा आहे. म्हणून तूर्त बिस्किटें कमी वापरणें जरूर आहे.

व्यापाऱ्यांनीं स्थानिक स्टॉकिस्टकडे चौकशी करावी






मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.

# मुंबई शेअर बाजार

(वि. म. लिमये आणि मं. यांजकडून)

व्याज-वजा

शिंदिया स्टीम रु. १-४-० दि. २०-१-४७

बॉम्बे बर्मा रु. १० दि. ९-१-४७

व्याज-वजा

बेलापूर रु. ९ दि. १५-१-४७

| १९४६ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार ३१।१२।४६ | बुधवार १।१।४७ | गुरुवार २।१।४७ | शुक्रवार ३।१।४७ | सोमवार ४।१।४७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६१७८; २५२७-८ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड्स | ३० | | | २८०७—८ | २८०५ | |
| ६३८; ४५७-८ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | | | ५०१ | ५०२—८ | |
| ६५; ३६-४ | | | बेंगाल स्टील | | | | ३८-१२ | ३८ | |
| ७१-४; ४४-१० | | | इंडियन आयर्न | २५'० | | | ४७—० | ४६—३ | |
| ३२७७-८; २१३२-८ | २५-०-०† | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | १०० | | | ३०६५—० | ३०६० | |
| ११८०; ६५८ | १२-०-०† | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | | | ९०३ | ९१३—० | |
| ९९९; ६६० | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | | | ७७९—० | ७६९—० | |
| [illegible]; ३९८ | ७-०-०S | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | | | ४१० | ४१२—८ | |
| ५५२; ३१४ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | | | ३८२ | ३८२ | |
| ५७१; ३२३ | ६-०-०† | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | ५० | बाजार बंद | बाजार बंद | ३६२ | ३६३ | बाजार बंद |
| ५९४; ३२५-८ | ९-०-०S | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | २ | | | ४३०—८ | ४३६ | |
| ७-४-६; ४-८-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | १० | | | ५—३ | ५—१—६ | |
| २९-१; १६-१२ | ०-१५-८ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १ | | | २०—१ | २०—१ | |
| ६-११-६; ३-३-६ | ०-३-० | म | ,, डिफर्ड्स | १०० | | | ४—५ | ४—६ | |
| १०९२-८; ७३५ | ४१-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | | | ७८५—० | ७९५ | |
| २७८; २२५ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | ५० | | | २२८ | २२८—८ | |
| ३७५; २४० | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | १२५ | | | ३४१ | ३४० | |
| ९१०; ६०५ | १०-०-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १५ | | | ६९० | ६९५ | |
| ६०-१० ३६-१२ | १-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | | | | ४६—८ | ४६—५ | |

शुक्रवार दि. ३-१-४७ चे भाव

| बँका | | वीज कंपन्या | | संकीर्ण | |
|---|---|---|---|---|---|
| बरोडा | १८६ | आंध्र व्हॅली | १८४२-८ | अलकॉक | ५८० |
| सेंट्रल | १२३—१२ | बॉम्बे ट्रॅम | १२६ | बॉम्बे स्टीम | ७५० |
| इंडिया | २६४ | टाटा हायड्रो | २१० | न्यू इंडिया | १०१—८ |
| इंपी० | २७४० | टाटा पॉवर | १९३० | शिवराजपुर | ४८ |
| | ६८३—१२ | | | टाटा केमिकल | १८—६ |
| रिझर्व्ह | १४७ | | | टाटा ऑईल | १०७—० |


आंध्र खादीचे
(म्हणजेच ४० नंबराच्या वरच्या नंबराच्या सुताच्या खादीचे)
—एकमेव विक्रेते—

**खादी मन्दिर**

२६२, बुधवार पेठ,
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

लग्नसमारंभास व मेजवानींसाठीं
—रुप्रॉक्सचा—
शुद्ध साखरेचा केशरयुक्त
**:: सुधारस ::**
वापरा
बाटली किंमत २-८-०
घाऊक माल घेतल्यास स्वस्त देऊं.
मागविण्याचा पत्ताः—एम्पायर एजन्सीज,
९५२, सदाशिव, लक्ष्मीरोड, पुणें २.

**शेअर्स विकणें आहेत:—**
गोवर्धन डेअरी फार्म्स लि.,
गोवर्धनवाडी, पुणें १.







## लिमिटेड कंपन्यांची प्रगति

**दि तोरगल इंडस्ट्रीज लि., कोल्हापूर**—वरील कंपनी कोल्हापूर संस्थानांत १५ ऑगस्ट रोजीं नोंदण्यांत आली. कोल्हापूर संस्थान व त्यांतील तोरगल जहागीर ह्यांत कारखाने काढणें, व्यापार करणें, आयात–निर्गत करणें, उद्योगधंदे स्थापन करणें, तेल गाळणें, बिस्किटें व केक्स तयार करणें, इत्यादि कंपनीचे उद्देश आहेत. बेळगांव–बागलकोट रस्त्यावर चंदर्गी येथें कारखाने, गोडाऊन, इत्यादिंसाठीं सोइस्कर व प्रशस्त जागा निवडण्यांत आली आहे. आसपासचे मुलुखांत कंपनीस लागणारे कच्चे पदार्थ मुबलक प्रमाणांत तयार होतात, ही मोठी सोय आहे. भुइमुगाचा येता मोसम गाठतां येईल ह्या बेतानें कारखाना उभारणीचें काम सुरू आहे. ता. २६ रोजीं पायाचा दगड समारंभानें बसविण्यांत येईल, असें समजतें. दरसाल १,३०,००० रुपये निवळ नफा व १२% डिव्हिडंड अपेक्षित आहे. तोरगलचे जहागिरदार मे. श्री. नरसोजीराव ऊर्फ बाबासाहेब शिंदे हे कंपनीचे पेट्रन असून श्री. विष्णु विनायक जोशी, वकील व लँडलॉर्ड, कोल्हापूर, हे चेअरमन आहेत. मेसर्स जी. के. आणि कं. कडे मॅनेजिंग एजन्सी आहे, त्यांत श्री. जी. एम. कानिटकर ह्यांचा हितसंबंध आहे. कंपनीनें ५ लक्ष रुपयांचें भांडवल विक्रीस काढलें आहे. त्यांत प्रत्येकी २५ रुपयांचे १२,००० ऑर्डिनरी व प्रत्येकी ५० रुपयांचे ४,००० प्रेफरन्स भाग आहेत.

**दि स्वस्तिक टेक्स्टाइल मिल्स लि., मुंबई**—वरील कंपनीचा प्रॉस्पेक्टस् प्रसिद्ध झाला आहे. कंपनीचें अधिकृत भांडवल ५० लक्ष रु. व विक्रीस काढलेलें भांडवल ३० लक्ष रु. आहे. स्वस्तिक सिल्क वीव्हिंग मिल्स परेल, आणि स्वस्तिक ब्लीचिंग डाइंग अँन्ड प्रिंटिंग वर्क्स चेंबूर हे मेसर्स पी. काशिनाथ आणि कं. च्या मालकीचे कारखाने कंपनी १६ लक्ष, १० हजार रुपयांस विकत घेणार आहे. २६,००० चात्या व ६०० माग इतपर्यंत गिरणी वाढविण्याचा कंपनीचा प्रयत्न आहे. मेसर्स पी. काशिनाथ आणि कं. ( श्री. गं. ल. नातू व श्री. पु. का. दिवेकर ) कडे मॅनेजिंग एजन्सी आहे. मॅनेजिंग एजंटांना दरमहा २ हजार ते ५ हजार रु. अलावन्स मिळावयाचा आहे.

**लाइट अँड पॉवर सप्लायर्स लि. पुणें**—वरील कंपनी पालघर व अथणी येथें सध्या वीज निर्मिति करीत आहे. औंध शहरास वीज तयार करून पुरविण्यासाठी स्थापन झालेल्या लाइट अँड पॉवर सप्लायर्स लि., औंधची मॅनेजिंग एजन्सी तिनें मिळविली आहे. औंध येथें पॉवर हाउसच्या उभारणीचें काम सुरू झालें आहे. पैशाच्या वाढत्या गुंतवणुकीसाठी तिनें आणखी शेअर्स विक्रीस काढण्याचें ठरविलें आहे. आज कंपनीचे १ लक्ष, ९४ हजार रुपयांचे भाग खपले आहेत. ३० जून १९४६ अखेर संपलेल्या वर्षी कंपनीस ३,६०७ रु. निवळ नफा झाला. एकूण ३,३१५ रु. भागीदारांस ( प्रेफरन्स ५%; ऑर्डिनरी ३% ) डिव्हिडंड रूपानें वाटले जातील.

**दि किरण डेअरी फार्म लि., पुणें**—१० लक्ष रु. अधिकृत भांडवलाची वरील कंपनी नोंदण्यांत आली आहे. ५ लक्ष रुपयांचें भांडवल विक्रीस काढलेलें आहे. २०% भांडवलाचे शेअर्स ५ाच टक्के रिडीमेबल क्यु. प्रेफरन्स असून बाकीचे ऑर्डिनरी आहेत. डेअरीचा धंदा आधुनिक पद्धतीनें चालविणें हा कंपनीचा मुख्य उद्देश आहे. श्री. एस. व्ही. टिळक, बी. एजी. हे डायरेक्टर बोर्डाचे चेअरमन असून श्री. एस. व्ही. रानडे, डॉ. डी. एस. सरदेसाई, श्री. एल. आर. गोखले, श्री. एन. व्ही. मेहेंदळे, श्री. जी. एम. गुप्ते वगैरे मंडळी बोर्डाचे सभासद आहेत. सुप्रसिद्ध शेतकी तज्ज्ञ श्री. के. व्ही. जोशी व श्री. एन. व्ही. कानिटकर हे कंपनीस शेतीविषयक सल्ला देणार आहेत. मेसर्स पी. लिमये आणि कं. कडे मॅनेजिंग एजन्सी आहे. श्री. ए. जी. लिमये, आय. डी. डी. (बंगलोर) हे डेअरी मॅनेजर म्हणून काम करणार आहेत.

**डिस्कौंट बँक ऑफ इंडिया लि.**—वरील बँकेची तिसरी वार्षिक सभा नुकतीच झाली. ३० जून १९४६ अखेरच्या आढाव्यांत ३,७३,९१३ रुपये तोटा दिसत आहे.


# तोच सुदिन

कीं

ज्या दिवशीं भारतावर

स्वातंत्र्यसूर्य चमकेल

पण हा सुदिन आपण स्वयंसिद्ध झाल्याविना कसा दिसेल !

याकरतां देशांतील सर्व उद्योगधंदे पूर्ण राष्ट्रीय करून परदेशांत जाणारा द्रव्यौघ थांबविणें, हें आपलें आद्य कर्तव्य ठरतें. तरी आयुष्याच्या विम्याचा धंदा करणारी

येथील सुप्रसिद्ध

## कॉमनवेल्थ

## विमा कंपनी लि.,

येथें आपला स्वतःचा विमा उतरून आपल्या कर्तव्यांतून मुक्त व्हा.

एजन्सीसाठी आजच लिहा अगर भेटा

ल. ब. ऊर्फ अण्णासाहेब भोपटकर—अध्यक्ष

व एस. एम. जोशी—मॅनेजिंग डायरेक्टर









चीफ एजंट:—

न्यू दत्त एजन्सी

१००, रविवार पेठ, मोती चौक, पुणें.










हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाविलास,' ८१३, शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.